दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : ३१९
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, सोमवार, दि.३० जून २०२५



हिंदी भाषा सक्तीचे दोन्ही शासन निर्णय रद्द

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मोठी घोषणा

अक्षराज : प्रतिनिधी
दि.२९, मुंबई :

महाराष्ट्राच्या राजकारणातील मोठी बातमी समोर येत आहे. शालेय शिक्षणात इयत्ता पहिलीपासून हिंदी भाषा सक्तीच्या निर्णयावरुन मोठा वाद निर्माण झाला आहे. शिवसेना ठाकरे गट आणि मनसे पक्ष या निर्णयाविरोधात येत्या ५ जुलैला भव्य मोर्चा काढणार आहेत. तसेच विविध पक्षांकडून या निर्णयाला विरोध होतोय. त्यामुळे महाराष्ट्र सरकारने आता मोठा निर्णय घेतला आहे. विधी मंडळाचं उद्यापासून पावसाळी अधिवेशन सुरु होणार आहे. या अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला आज मुंबईत सह्याद्री अतिथीगृह येथे चहापानाचा कार्यक्रम पार पडला. त्यानंतर राज्य मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. या बैठकीत हिंदी भाषेबाबत मोठा निर्णय घेण्यात आला. मंत्रिमंडळ बैठकीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांची एकत्रित पत्रकार परिषद पार पडली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हिंदी भाषाबाबत याआधी घेतलेले दोन्ही शासन निर्णय मागे घेत असल्याची घोषणा केली.

देवेंद्र फडणवीस काय म्हणाले?

हिंदीचा विषय हा आमच्याकरता मराठीचा विषय आहे. आम्ही राज्यात मराठी अनिवार्य केली आहे. कुणालाही भारतीय भाषा शिकता येईल, असा निर्णय आम्ही घेतला आहे. तरीही झोपलेल्याला उठवता येतं पण झोपेचं सोंग करणाऱ्याला उठवता येत नाही. हिंदी ऑप्शनल आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे सर्वात आधी कर्नाटकने लागू केलं. त्यानंतर मध्य प्रदेश, तेलंगणा, उत्तर प्रदेशने लागू केलं. २१ सप्टेंबर २०२० रोजी महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी हे शैक्षणिक धोरण कशाप्रकारे लागू करायचं यासाठी एक तज्ज्ञ समिती नियुक्त केली होती. १६ ऑक्टोबर २०२० ला त्याचा जीआर निघाला. अतिशय नामवंत अभ्यासक या समितीत होते. डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या अध्यक्षतेखाली १८ लोकांची कमिटी तयार करण्यात आली. या समि तीमधील सर्व लोकं मराठी, नामवंत, शिक्षण क्षेत्र समजणारे लोकं आहेत. १४ सप्टेंबर २०२१ रोजी या समितीने १०१ पानांचा अहवाल सादर केला. त्याचं ट्विट माझ्याकडे आहे. तो अहवाल स्वीकारताना उद्धव ठाकरे देखील होते. डीजीआयपीआरने याबाबत ट्विट केलं होतं, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

या अहवालात काय म्हटलं आहे?

या अहवालाच्या आठव्या प्रकरणात भाषेचा विषय आला आहे. पृष्ठ क्रमांक ५६ वर अहवालात भाषेचा विषय आहे. यामध्ये उपगट निर्माण करण्यात आला होता. या उपगटात महत्त्वाचे सदस्य उबाठाचे विजय कदम हे नेते होते. त्यांनी मुद्दा क्रमांक ८.१ इंग्रजी आणि हिंदी भाषा ही दुसरी भाषा म्हणून पहिल्या वर्गापासून लागू करण्यात यावी. पहिली ते बारावी असे बारा वर्षे विद्यार्थी इंग्रजी शिकतील तर त्यांना इंग्रजी भाषेची जाण येईल. आवश्यक इंग्रजी पुस्तक वाचता येतील. पुढील अभ्यासाठी ते सक्षम असतील. इंग्रजी आणि हिंदी या भाषा सक्तीची करण्यात यावी. पदवीधर शिक्षणातही हिंदी सक्तीची करण्यात यावी. उबाठाच्या उपनेत्यांनी ही शिफारस केली आहे, असा दावा देवेंद्र फडणवीस यांनी केला.

हा अहवाल सादर झाल्यानंतर मंत्रिमंडळात आला. त्यानंतर ७ जानेवारी २०२२ ला इतिवृत्त झाला. माझ्याकडे याचं इतिवृत्त सुद्धा आहे. त्यावर उद्धव ठाकरे यांची सही आहे. अहवाल स्वीकारताना कुठेही त्रिभाषा सूत्र बाजूला ठेवा, आम्हाला मान्य नाही, असं कुठेही म्हटलेलं नाही. उलट तिसरी भाषा का हवी? ॲकेडमीक बँक ऑफ क्रेडीटलाही याच मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे, अशी माहिती देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

काही लोकं म्हणतात आम्ही निर्णय घेतला नाही. केवळ अहवाल स्वीकारला. नाही. या ठिकाणी मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा विषय घेऊन त्याला म ान्यता दिली. त्यावर अंमलबजावणी करण्यासाठी समिती स्थापन केली. ती कमिटीने काम करत-करत आमच्या काळात जीआर निघाले आहेत, असा खुलासा फडणवीसांनी केला.

दोन्ही जीआर रद्दचा निर्णय...!

या सगळ्या प्रक्रियेत राज ठाकरे नव्हते. कारण मंत्रिमंडळात आणि विरोधक त्यांच्या पक्षातील कोणी नव्हतं. राज ठाकरेंनी उद्धव ठाकरेंना पहिला प्रश्न विचारला पाहिजे की, तुम्हीच या निर्णयाला मान्यता दिली तर आता कोणत्या तोंडाने आंदोलन करत आहात? हा प्रश्न विचारायला पाहिजे. ज्यादिवशी दुसरा जीआर काढला तेव्हाही भूमिका मांडली होती. आम्ही सक्तीची हिंदी करणार नाहीत, असं फडणवीस म्हणाले.

आम्हाला अशाप्रकारचे विषय सर्वानुमते करुन घ्यायचे आहेत. म्हणून आम्ही त्यादिवशीच सांगितलं की, आमचे शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे सर्वांशी बोलतील, सर्वांसमोर वस्तुस्थिती ठेवतील, कारण तिसरी भाषा शिकली नाही तर ॲकडमिक बँक ऑक क्रेडीटमध्ये आमच्या मराठी मुलांना जास्त गुण मिळणार नाहीत. पण इतर मीडियमच्या विद्यार्थ्यांना मराठी अनिवार्य आहे. गुजराती मीडियमच्या विद्यार्थ्यांना मराठी आणि इंग्रजी शिकता येईल. त्यामुळे त्यांना ॲकडमिक बँक ऑफ क्रेडीटचे गुण मिळतील. यामुळे आमचे मराठी मुलं तिथे मागे पडतील आणि प्रवेशाच्या वेळी ते मागे पडतील, असं फडणवीस म्हणाले. ही परिस्थिती सर्व नेते आणि अभ्यासकांसमोर मांडावी, त्यानंतर एक सांगोपा निर्णय घ्यावा या दृष्टीने आन्ही दादा भुसे यांना सांगितलं. यावर चुकीच्या पद्धतीने राजकारण करणं सुरु आहे. त्यामुळे मंत्रिमंडळ बैठकीत आम्ही चर्चा केली. यावेळी आम्ही असा निर्णय घेतला की, त्रिभाषा सूत्रा संदर्भात ही भाषा कुठल्या वर्गापासून लागू करावी, मुलांना काय चॉईस द्यावी, याचा निर्णय करण्याकरता राज्य सरकारच्या वतीने डॉ. नरेंद्र जाधव यांच्या नेतृत्वात समिती तयार करण्यात येईल. त्यांच्या नेतृत्वात एक समिती तयार केली जाईल. त्यात आणखी काही सदस्य असतील. त्यांची नावे लवकरच घोषित केली जातील, असं देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं.

या समितीचा अहवाल आल्यानंतरच त्रिभाषा सूत्रबाबत निर्णय लागू केला जाईल. त्यामुळे १६ एप्रिल २०२५ आणि १७ एप्रिल २०२५ हे दोन्ही शासन निर्णय आम्ही रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. दोन्ही शासन निर्णय रद्द करत आहोत, असं देवेंद्र फडणवीस यांनी घोषित केलं. नवी समिती अभ्यास करेल. सर्वांचं म्हणणं ऐकून घेईल, त्यानंतर आपल्या विद्यार्थ्यांच्या हितासाठी काय निर्णय घेता येईल ते अहवालात सांगेल. त्यानंतर राज्य मंत्रिमंडळ तो निर्णय मान्य करेल. आमची नीती विद्यार्थी आणि मराठी केंद्रीत असेल. यामध्ये आम्हाला कोणतही राजकारण करायचं नाही, असंही फडणीसांनी यावेळी स्पष्ट केलं.

थोडक्यात

पंतप्रधान मोदींनी साधला अंतराळवीर सुभांशू शुक्लाशी संवाद

अक्षराज : प्रतिनिधी
दि.२८, नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर (आयएसएस) उपस्थित असलेल्या भारतीय अंतराळवीर ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला यांच्याशी थेट संवाद साधला. व्हिडिओ कॉलद्वारे पार पडलेला हा संवाद देशभरात प्रसारित झाला आणि नागरिकांनी त्याला भरभरून प्रतिसाद दिला. शुक्ला हे 'ॲक्सिओम स्पेसच्या एएक्स-४' मोहिमेचे मिशन पायलट आहेत आणि १९८४ नंतर अंतराळात गेलेले पहिले भारतीय अंतराळवीर म्हणून ओळखले जातात. त्यांनी फ्लोरिडा मधील नासाच्या केनेडी स्पेस सेंटरमधून स्पेस एक्स च्या ड्रॅगन यानातून उड्डाण घेतलं होतं, ज्याअंतर्गत सात महत्त्वाचे वैज्ञानिक प्रयोग सध्या अंतराळात राबवले जात आहेत.

संवादादरम्यान पंतप्रधान मोदींनी विचारले की, अंतराळात पोहोचल्यावर त्यांच्या मनात पहिला विचार कोणता आला? त्यावर शुक्ला म्हणाले की, बाहेरून पृथ्वी पाहताना कोणतीही सीमारेषा दिसत नाही, ती एकसंध आणि विलक्षण भासते. तेव्हा 'वसुधैव कुटुंबकम्' या आपल्या संस्कृतीचा खरा अर्थ समजला, असे त्यांनी आवर्जून सांगितले. त्यांनी पुढे अंतराळात सुरू असलेल्या प्रयोगांविषयी माहिती दिली, विशेषतः स्टेम सेल्सवरील प्रयोग वृद्धांच्या आरोग्यासाठी उपयुक्त ठरू शकतात, असंही ते म्हणाले. या संवादात एक हलकीशी हास्याची लहरही उमटली, जेव्हा शुक्ला यांनी त्यांच्या टीमला अंतराळात गाजराचा हलवा दिल्याचं आनंदाने सांगितलं, त्यावर मोदींनी हसून प्रतिक्रिया दिली – तुमच्यातला भारतीयपणा तुमच्या अन्नातही दिसतो.

हा संपूर्ण संवाद केवळ वैज्ञानिक दृष्टिकोनातून नव्हे, तर भावनिक आणि सांस्कृतिक बंध प्रस्थापित करणारा ठरला. भारताच्या अंतराळ संशोधनाच्या नव्या पर्वाची ही सुरुवात असून, पंतप्रधान मोदींनी आपल्या शेवटच्या शब्दांत म्हटलं तुम्ही अंतराळात असलात, तरी प्रत्येक भारतीयाच्या हृदयात आहात. हा संवाद आणि शुक्ला यांचे योगदान अनेक भारतीयांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

पत्नीला मारहाण, फरफटत गॅलरीत नेलं...

दि.२९, पुणे : सासरच्या मंडळींना सुमारे ५० लाख रुपयांची मदत दिल्यानंतरही विवाहितेवर सतत अत्याचार करून, तिला घरातून गॅलरीतून ढकलून देऊन खून करण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना घडली. वडगाव शेरीतील सिलिकॉन बे सोसायटीत हा प्रकार घडला. चंदननगर पोलिसांनी पतीसह सहा जणांवर खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल केला आहे.

सर्व आरोपी फरारी...

२४ वर्षीय विवाहितेने चंदननगर पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. पती प्रणील निकुडे (३२), सासरे उदय निकुडे (६०), सासू वैशाली निकुडे (५५), दीर प्रतीक निकुडे (३०), चुलत सासरे माणिक निकुडे आणि त्यांचा मुलगा प्रमोद निकुडे (सर्व रा. वडगाव शेरी व कल्याणीनगर) अशी आरोपींची नावे असून, ते सर्व सध्या फरारी आहेत.

पैसे घेऊनही छळ सुरू...

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एप्रिल २०२३मध्ये तिचा विवाह म ोठ्या थाटात झाला होता. वडिलांनी २५ लाख रुपयांचा खर्च करून रोख रक्कम, दागिने व गृहोपयोगी वस्तू दिल्या. मात्र, विवाहानंतर काही महिन्यांतच तिच्यावर अत्याचार सुरू झाले. त्यानंतर वडिलांनी नातेवाइकांकडून उसने पैसे घेऊन सासरकडील मंडळींना वेळोवेळी ५० लाख रुपयांपर्यंत आर्थिक मदत केली; तरीही तिचा शारीरिक आणि मानसिक छळ सुरूच राहिला.

'लोणार सरोवर' च्या शिरपेचात पुन्हा एक मानाचा तुरा...

अक्षराज : उध्दव आटोळे
दि.२९, लोणार (बुलडाणा) : जगविख्यात 'लोणार सरोवर' मधील परिसर सन २००० साली 'लोणार सरोवर अभयारण्य ' म्हणून घोषित झाले. बेस्साल्टिक रॉक मधून तयार झालेले एकमेव सरोवर म्हणून लोणार सरोवराची ओळख आहे. 'लोणार सरोवर अभयारण्य' हे ३६५ हेक्टर जागेतील जिल्ह्यातील सर्वात लहान अभयारण्य असले तरी देशात या अभयारण्यामुळे बुलढाणा जिल्ह्याची मान अभिमानाने उंचावली आहे. अभयारण्य व्यवस्थापनामध्ये लोणारने देशात दहावे स्थान पटकावल्याने उल्कानगरीच्या किर्तीचा ठेवा वाढवणारी सकारात्मक बातमी समोर आली आहे.

भारतीय वन्यजीव संस्थान आणि केंद्रीय पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाने याबाबतचा अहवाल प्रसिद्ध केला आहे. यंत्रणेने देशभरातील वन्यजीव अभयारण्याचा नुकताच आढावा घेतला. यामध्ये रामसर हा जागतिक कीर्तीचा दर्जा प्राप्त असलेल्या लोणार अभयारण्याचा देखील समावेश होता. जंगलांच्या प्रभावी व्यवस्थापनामध्ये लोणार अभयारण्याचा देशांमध्ये दहावा क्रमांक लागला आहे. महाराष्ट्रातील उमरेड कराडला राज्यात पहिले तर राज्यात सातवे स्थान मिळाले आहे.

देशभरातील ४३८ राष्ट्रीय उद्याने आणि वन्यजीव अभयारण्याचे मूल्यमापन करण्यात आले. विविध जंगलांची व्यवस्थापन कशा प्रकारे केली जाते. याचा अभ्यास गत पाच वर्षांमध्ये करण्यात आला. यामध्ये उत्तम स्थिती ही ८४ ठिकाणी आढळून आली तर वाईट चा शेरा देखील १८ अभयारण्याच्या वाट्याला आल्याची माहिती सूत्राने दिली आहे. लोणार हा पर्यटन दृष्ट्या विकसित करण्यासाठी शासकीय पातळीवर आराखडा घोषित झाला आहे या आराखड्याचे पुढे काय झाले किंवा त्याची काय स्थिती आहे, त्याची माहिती जिल्हा वासियांना चांगलीच आहे.

जगभरातून पर्यटकांना बुलढाणा जिल्ह्यात खेचून आणण्याची क्षमता असलेल्या या लोणार आणि येथील वनसंपदेला अनुषंगाने पर्यटन विस्ताराच्या सुविधा निर्माण होणे आवश्यक आहे. हे कधी होईल हा खरा प्रश्न म ात्र सध्या अनुत्तरितच आहे. मात्र असे असले तरी देश भरातील अभयारण्य उत्तम व्यवस्थापनामध्ये लोणारचा दहावा क्रमांक लागणे ही बाब नक्कीच सुखावणारी आहे.

गिरगाव शासकीय आश्रमशाळेत नववीच्या विद्यार्थिनीची आत्महत्या

अक्षराज : निलेश कासट
दि.२८, तलासरी : तलासरी तालुक्यातील आदिवासी विकास प्रकल्प अंतर्गत येणाऱ्या गिरगाव शासकीय आश्रम शाळेतील नववी इयत्तेत शिकणाऱ्या विद्यार्थिनीने शुक्रवारी दुपारी वस्तीगृहात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. पल्लवी शरद खोटरे (वय १४, रा. दाभाडी-वांगणपाडा, ता. डहाणू) असे आत्महत्या केलेल्या विद्यार्थिनीचे नाव असून, या घटनेमुळे वस्तीतिगृहात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

पल्लवी खोटरे ही विद्यार्थिनी शुक्रवारीच आपल्या घरी सुट्टीवरून शाळेत परतली होती. सकाळी सुमारास तिचे नातेवाईक तिला वसतिगृहात सोडून गेले होते. दुपारी, तब्येत बरी नसल्याचे कारण देत तिच्या वर्गातील दोन विद्यार्थिनींनी तिला वसतिगृहात विश्रांतीसाठी नेले. काही वेळातच तिने वसतिगृहाच्या पहिल्या मजल्यावरील लोखंडी अँगलला ओढणीच्या सहाय्याने गळफास लावून आत्म हत्या केली.

मागील घटनांचा पुनरुच्चार, प्रशासनाचा निष्काळजीपणा?

गेल्याच वर्षी गिरगाव आश्रमशाळेत समलैंगिक संबंधासंबंधीचा प्रकार समोर आला होता. त्या घटनेनंतरही शाळा प्रशासनाने विद्यार्थ्यांच्या मानसिकतेकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप पालक व ग्रामस्थांकडून केला जात आहे. विद्यार्थिनींच्या सुरक्षेसाठी महिला शिक्षिका किंवा महिला अधीक्षिका कायम स्वरूपी उपस्थित असावी, अशी मागणी पुन्हा एकदा जोर धरू लागली आहे. पल्लवीच्या आत्महत्येचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नसले तरी, वाढता मानसिक तणाव, कौटुंबिक पार्श्वभूमीतील अडचणी, शैक्षणिक दडपण आणि भावनिक अस्थैर्य यांसारख्या कारणांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्महत्येच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याची गंभीर बाब अधोरेखित झाली आहे. विशेषतः आदिवासी भागातील शासकीय आश्रमशाळांमध्ये समुपदेशन सेवा उपलब्ध नसणे हा एक मोठा प्रश्न आहे.

या घटनेनंतर पल्लवीच्या नातेवाईकांनी व इतर पालकांनी शाळा प्रशासनाच्या निष्काळजीपणावर जोरदार संताप व्यक्त केला आहे. शाळेत मुलींसाठी योग्य पर्यवेक्षण व मानसिक आधार उपलब्ध करून दिला गेला असता, तर ही घटना टळू शकली असती, असे काहींचे म्हणणे आहे.पालघर जिल्हा उलगुलान ब्रिगेड चे जिल्हाध्यक्ष अशोक शिंगाडा व सामाजिक कार्यकर्त्यांनी शाळेच्या व्यवस्थापनावर कारवाईची मागणी केली आहे.

घटनेची माहिती मिळताच तलासरी पोलीस ठाण्याचे पथक घटनास्थळी दाखल झाले. शवविच्छेदनासाठी पल्लवीचे पार्थिव रुग्णालयात पाठवण्यात आले असून, पुढील तपास पोलीस करत आहेत. तिच्या आत्महत्येम ागे कोणते सामाजिक किंवा कौटुंबिक कारण होते का, याचा शोध लावण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

कांदा खरेदीचा वांधा!

भारतीयांच्या 'किचन'मध्ये जीवनावश्यक बनलेला कांदा आणि वाद हे समीकरण अलीकडच्या काळात अधिक घट्ट होताना दिसते. हंगाम शेतीचा असो वा निवडणुकीचा, कांदा येनकेन प्रकारे चर्चेत असतो, मग विषय दरांतील वाढीचा असो वा घसरणीचा! मागणी-पुरवठ्याचे गणित बिघडून उत्पादक आणि कधीकधी सरकारही या कात्रीत सापडत असते. सामान्य ग्राहक त्यात भरडला गेला की अधिक गहजब होतो. या खेपेला केंद्राच्या बहुचर्चित खरेदी धोरणातील निकष आणि कमी दर निश्चितीमुळे उत्पादक संतप्त झाले आहेत.

लोकसभा निवडणुकीत हरित पट्ट्यात फटका बसल्यानंतर केंद्राने राज्याच्या विधानसभा निवडणूक प्रचारादरम्यान चूक सुधारली. कांदा निर्यातीला चाल देणारे काही निर्णय घेतले. निर्यात शुल्क, मूल्य हटविले. प्रत्यक्षात त्याचा फायदा शेतकऱ्याला झाला काय, हा संशोधनाचा मुद्दा. बफर स्टॉकसाठी खुल्या बाजारातून खरेदीचे आश्वासन तेव्हा उत्पादकांना दिले गेले. अखेर विलंबाने का होईना नाफेड आणि 'एनसीसीएफ' या संस्थांच्या माध्यमातून तीन लाख टनाची कांदा खरेदी सुरू झाली; परंतु प्रत्यक्षात अटी-शर्तींच्या जंत्रींत अडकली. प्रतवारीचे निकष कठोर झाले. खरेदीचा दर बाजारसमित्यांपेक्षा दोनशे ते तीनशे रुपयांनी कमी निश्चित झाला, ज्यामुळे नुकसान होत असल्याचा उत्पादकांचा दावा आहे. सध्या चांगल्या कांद्याला लिलावात दोन हजार ते बावीसशे रुपयांचा दर मिळतो. सरकारी खरेदीचा दर मात्र १४३५ रुपये ठरला. त्यातून उत्पादन खर्चही निघत नाही. पूर्वी खरेदीचे दर स्थानिक पातळीवर निश्चित व्हायचे. परंतु, आता ते केंद्राच्या ग्राहक व्यवहार विभागाच्या सुचनांनुसार ठरत असल्याने ही तफावत झाल्याचे निरीक्षण अभ्यासक नोंदवतात.

बाजारातील कांद्याचा अतिरिक्त साठा उचलून दर नियंत्रणात ठेवणे आणि शेतकऱ्यांना आर्थिक आधार देणे, हा खरेदीचा मुख्य उद्देश. परंतु, खरेदीच्या ठरलेल्या कमी दरांमुळे बाजारातील कांदाही कोसळतो की काय, अशी स्थिती आहे. वास्तविक यंदा नाशिक जिल्ह्यात कांद्याचे उत्पादन ६३ टक्क्यांनी वाढले. विक्रमी साठ लाख टनांपर्यंत ते पोहोचले, जे गेल्या वर्षापेक्षा जवळपास दुप्पट आहे. मे महिन्यातील पावसाने पाचदहा टक्के नासाडी झाल्यानंतरही बम्पर पीक आले. अडीच लाख हेक्टवर क्षेत्र लागवडीखाली आहे. त्या तुलनेत सरकारी खरेदी अगदीच किरकोळ. साठवणुकीची सुविधाही अवघी पंचवीस टक्के!

व्यापाऱ्यांकडील कांदा खरेदी करून तो प्रत्यक्ष शेतकऱ्यांकडील दाखवून कोट्यवधी रुपये मधल्या साखळीने लाटले. हे प्रकरण चौकशीच्या पातळीवर आहे. अशा स्थितीत पुन्हा त्याचीच पुनरावृत्ती होत असूनही यंत्रणांचे 'हाताची घडी, तोंडावर बोट' आहे. उत्पादन अधिक असल्याने सरकारला कांदा खरेदी करायची नाही, तर केवळ तसे भासवायचे आहे, असे दिसते. सरकारने खरेदीचे दर स्पर्धात्मक ठेवावेत आणि निकष शिथिल करून प्रक्रियेत पारदर्शकता आणावी, असा आग्रह शेतकरी संघटनांनी धरला आहे. 'धरलं तर चावतंय अन् सोडलं तर पळतंय' अशी कांदा प्रश्नावर सरकारची अवस्था होते. उत्पादकांना मात्र धरसोडीच्या निर्णयांऐवजी सुसंगत धोरणे आणि आधाराची गरज वाटते. कांद्याचे दर आणखी काही महिने जेमतेम राहतील. परंतु, अतिपावसाने खरिपात पिकाचे नुकसान झाल्यास दिवाळीनंतर चित्र पलटू शकते. तेव्हा मात्र सरकारला उत्पादकांचे स्मरण होईल. खरेदीच्या दरांत शेदोनशे रुपयांची वाढ केल्यास तूर्तास तिढा सुटू शकतो. ग्राहकांनाही केवळ बघ्याची भूमिका घेता येणार नाही. उत्पादकांना, ग्राहकांचा पाठिंबा दिसून आल्यास दोन्ही घटक जवळ येऊ शकतात. यंत्रणांवर दबाव वाढू शकतो. कृत्रिम बुद्धिमत्तेसह आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेतीत क्रांती घडवून आणायच्या गप्पा सरकार करते. दुसऱ्या बाजूला कृषी धोरणांत कमालीचा विरोधाभास दिसतो. हे दुटप्पी वागणे परवडणारे नाही. 'गरज सरो वैद्य मरो,' ही वृत्ती थांबत नाही, तोवर शेती व शेतीवर गुजराण असणाऱ्यांचे प्रश्न सुटणे कठीणच!

विधिमंडळाचे अधिवेशन फलदायी ठरो !

राज्य विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन आजपासून सुरु होत आहे. नवीन सरकार स्थापन झाल्यानंतर पार पडणाऱ्या या पावसाळी अधिवेशनात सरकारवर आरोपांचाच पाऊस पडण्याची अधिक शक्यता आहे. शेतकऱ्यांची कर्जमाफी, अवकाळी पावसामुळे वाया गेलेल्या शेतपिकांची नुकसानभरपाई, शक्तिपीठ महामार्गाला ठिकठिकाणी होत असलेला विरोध, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका लांबल्यामुळे पावसाच्या आरंभी शहरांची झालेली दुर्दशा, रस्त्यांवरील खड्डे, पुण्यातील वैष्णवी हगवणे यांचा हुंडाबळी, राज्यातील स्त्री अत्याचाराचा वाढत आलेख, लाडक्या बहिणींना वाढीव पैसे केव्हा मिळणार ?, पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यात महाराष्ट्रासह देशातील २६ पर्यटकांची झालेली हत्या, पुण्यातील इंद्रायणी नदीवरील पूल कोसळण्याची घटना आणि सध्या गाजत असलेला विषय म्हणजे शाळांमध्ये पहिलीपासून हिंदी भाषेची सक्ती या सर्व प्रश्नांवर विद्यमान मंत्र्यांना घेरण्याची पुरती तयारी विरोधी पक्षांनी केली आहे. अर्थात हे सर्व अपेक्षितच असल्याने सरकारमधील संबंधित मंत्री आणि मुख्यमंत्री यांनीही या सर्व प्रश्नांना उत्तरे देण्याची तयारी केली असेलच.

राज्यातील सामान्य जनतेच्या प्रश्नांवर आणि समस्यांवर सत्ताधारी आणि विरोधी पक्ष यांनी एकत्रितपणे सारासार चर्चा करून त्यावर ठोस उपाययोजना काढण्याच्या दृष्टीने भरवण्यात येणाऱ्या अधिवेशनांच्या एकूण कालखंडात साधक-बाधक चर्चा नेमकी किती काळ होते ? अधिवेशनाच्या पहिल्या दिवसापासूनच विरोधी पक्षाची मंडळी अधिवेशन चालू न देण्याच्याच तयारीत असतात. जनतेचे कोणते प्रश्न सभागृहात मांडायचे यापेक्षा सरकारला कोंडीत कसे पकडायचे याम ध्येच यांना अधिक स्वारस्य असते. सभागृहाच्या प्रवेशद्वारावर ठिय्या आंदोलन करणे, अधूनमधून सभात्याग करणे, चर्चेच्या कालावधीत आरडाओरड आणि घोषणाबाजी करत गोंधळ घालणे यांसारख्या प्रकारांमुळे अधिवेशन काळात सभागृहाला रणांगणाचे स्वरूप आलेले असते. यामध्ये गैरवरणुकीमुळे अनेकदा काही आमदारांचे निलंबन करावे लागते. मग पुन्हा निलंबन कसे नियमबाह्य आहे, विरोधी आम दारांचे निलंबन करून सरकार कसा जनतेचा आवाज दाबण्याचा प्रयत्न करत आहे, यासाठी पुन्हा सरकारविरोधात निदर्शने, घोषणाबाजी केली जाते. जनतेचे प्रश्न राहिले बाजूला एकमेकांची उणीधुणी काढण्यातच अधिवेशनाचे सूप वाजते.

अधिवेशनाच्या काळात सभागृहाला आलेले आखाड्याचे स्वरूप पाहता असा गोंधळ घालण्यासाठी आमदारांना आपण निवडून देतो का हा प्रश्न कोणत्याही सामान्य मतदाराला पडल्यावाचून राहात नाही. वर्षातून तीन वेळा ही अधिवेशने भरवली जातात. प्रत्येक अधिवेशनासाठी सरकार कोट्यवधी रुपये खर्च करते. कष्टकरी सामान्य जनतेच्या घामाच्या मिळकतीतून कररूपाने सरकार दरबारी जमा होणारा हा पैसा असतो. त्याचा विनियोग व्हायला नको का ? सामान्य नागरिकांवर ओढवलेल्या नैसर्गिक आणि कृत्रिम संकटांवर सरकारने योग्य तो मार्ग काढावा, सामान्य जनतेच्या मूलभूत गरजा पुरवण्यात येणाऱ्या अडथळ्यांवर उपाययोजना काढाव्यात, विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा मिळाव्यात, युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, राज्यात कायदा आणि सुव्यवस्था यांचे पालन व्हावे. स्त्रियांचे रक्षण व्हावे, सरकारी योजना तळागाळापर्यंत पोहोचाव्यात, आरोग्य व्यवस्थेबाबत सुसूत्रता असावी , एखाद्या गंभीर मुद्याबाबत स्वतंत्र कायदा करण्याची आवश्यकता असल्यास त्याबाबत विचारविनिमय घडवून आणणे, प्रचलित कायद्यात काही सुधारणा करायची असल्यास त्यावर सविस्तर अभ्यास करणे आणि या सर्वांच्या सुयोग्य नियोजनासाठी एकमेकांची मते जाणून घेणे यासाठी अधिवेशन ही संधी असते; मात्र या संधीकडे सरकारला नामोहरम करण्याची पर्वणी म्हणून पहिले जात आहे. हे केवळ राज्यात घडते असे नव्हे. संसदेच्या प्रत्येक अधिवेशन काळातही हीच प्रथा राबवली जाते. गेल्या काही वर्षांतील या अधिवेशनांची फलश्रुती पाहता ती नगण्यच आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. सभागृहातील गोंधळ थांबवताना आणि आमदारांना शिस्तीचे धडे देताना सभागृहाच्या अध्यक्षांचा कस लागतो, त्यांना नाहक मनस्ताप सहन करावा लागतो, काहीवेळा तर गोंधळ थांबवण्यासाठी पोलिसांनाही पाचारण करावे लागते. यापुढेही अधिवेशन काळात हेच घडणार असेल तर ही खर्चिक अधिवेशने हवीत तरी कशाला

जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई
संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०

सायन पनवेल महामार्ग व रेल्वे स्टेशन सखोल स्वच्छता मोहीम यशस्वी

अक्षराज : जे. के. पोळ

दि.२९, नवी मुंबई : नवी मुंबईकर नागरिक स्वच्छतेविषयी जागरूक असल्यामुळे नवी मुंबईचे स्वच्छते मधील राष्ट्रीय मानांकन नेहमीच उंचावत राहिले आहे. त्यामुळे पावसाळ्याच्या दिवसात आज डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडा अलिबाग यांचे ३५०० हून अधिक श्रीसदस्य तसेच नागरिक एकत्र येऊन सायन पनवेल म हामार्ग व रेल्वे स्टेशन्सच्या सखोल स्वच्छता मोहीमेत सहभागी झाले ही समाधान व आनंद देणारी बाब असल्याचे महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी सांगितले.

नवी मुंबई मनपा आणि डॉ.श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडा, अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने सायन पनवेल महामार्ग तसेच

बेलापूर, नेरूळ, जुईनगर, सानपाडा, वाशी या ५ रेल्वे स्टेशन्सची सखोल स्वच्छता मोहीम आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. यामध्ये २२ टन कचरा संकलित करण्यात आला. यामध्ये प्लास्टिकचे तुकडे, रॅपर्स, एकल वापर प्लास्टिक, बॉटल्स, कागद, कपडा अशा प्रकारचा कचरा तसेच अस्ताव्यस्त वाढलेले गवत, वेली यांचाही हरित कचरा संकलित करण्यात आला.

उरण फाटा येथून आयुक्त महोदयांच्या उपस्थितीत स्वच्छतेची सामुहिक शपथ घेऊन प्रारंभ झालेल्या या स्वच्छता मोहीमेचे विभागनिहाय नियोजन करण्यात आले होते. प्रत्येक ठिकाणी श्रीसदस्यांच्या उत्साही लक्षणीय उपस्थिती होती. उरणफाटा येथे आयुक्तांसमवेत अतिरिक्त आयुक्त डॉ.राहुल गेठे, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे परिमंडळ १ उपआयुक्त डॉ.अजय गडदे व परिमंडळ २ उपआयुक्त स्मिता काळे, परिमंडळ १ उपआयुक्त सोमनाथ पोटरे, समाजविकास विभागाचे उपआयुक्त किसनराव पलांडे, बेलापूर विभागाचे सहा. आयुक्त डॉ. अमोल पालवे आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

धटिंग...

गोड वाटते प्रारंभी
ऑनलाईन मिटींग
फसून जातोसहज
असे लोभस नेटिंग

अनोळखीव्यक्तीचे
मनात रंगले पेंटिंग
फसतात सुशिक्षित
सराईतपणे चिटिंग

ऑनलाईन ये कधी
असह्यवाटते वेटिंग
मोहजालात फसावे
असे मोहक फिटिंग

संधान जुळे मोहक
बांधून बसा बाशिंग
कळले ना चाणाक्षा
कधीपाठी घुसेशिंग

संभ्रमात हे घोटाळे
होऊन जाते कटिंग
आयु फसे जुगारात
हो इभ्रतीची बेटिंग

धास्ती जास्ती मनी
लफडेहोईलं प्रिंटिंग
लुटूलागले अहोरात्र
रे सायबरगुंड धटिंग

इज्जतीची नस बंदी
करे ऑपरेशन स्टिंग
भले गेले चक्रव्यूहात
भोगतात ब्लॉकमेलिंग

- हेमंत मुसरीफ, पुणे
९७३०३०६९९६

वाढती बालगुन्हेगारी ; धोक्याची घंटा

क्रिकेट खेळण्याच्या किरकोळ वादातून आठवीतील विद्यार्थ्याने नववीतील विद्यार्थ्याचा चाकूने भोसकून खून केल्याची धक्कादायक घटना अहिल्यानगर शहरातील नामांकित शाळेत घडली. या घटनेने राज्यभर खळबळ उडाली आहे. अर्थात अल्पवयीन मुलाने केलेला हा पहिलाच गंभीर गुन्हा नाही. याआधीही असे अनेक गुन्हे अल्पवयीन मुलांकडून घडले आहेत. गेल्याच वर्षी शाळेची बॅग फाडली या कारणामुळे एका शाळकरी विद्यार्थ्याने दुसऱ्या शाळकरी विद्यार्थ्यावर चाकूने वार केल्याची घटना पुण्यात घडली होती.

दोन वर्षापूर्वी क्राईम मालिका पाहून एका अल्पवयीन मुलाने आपल्या आजीची हत्या केल्याची घटना पुण्यातच घडली होती. तीनवर्षापूर्वी एका आठ वर्षीय मुलाने आपल्याच पाच वर्षीय बहिणीवर ब्लेडने वार करून हत्या केल्याची घटना जालना शहरात घडली होती. अल्पवयीन मुलांकडून असे गंभीर स्वरूपाचे गुन्हे घडल्याच्या बातम्या अलीकडे सातत्याने वर्तमानपत्रात वाचायला मिळतात याचाच अर्थ देशात बाल गुन्हेगारी वाढत चालली आहे. सण २०२२ - २३ या एका वर्षात एकट्या पुणे शहरात अशा प्रकारचे २४८ गुन्हे घडले असून पुण्याच्या ग्रामीण भागात १०४ गुन्हे घडले आहेत. राष्ट्रीय गुन्हे नोंदणी अहवालातच ही आकडेवारी नमूद करण्यात आली आहे. जर एकट्या पुण्यात एकावर्षात अल्पवयीन मुलांकडून इतके गुन्हे होत असतील तर संपूर्ण राज्यात आणि देशात अल्पवयीन मुलांकडून किती गुन्हे घडत असतील याची फक्त कल्पना केली तरी अंगावर काटा येतो. अर्थात देण्यात आलेली ही आकडेवारी फक्त नोंद झालेल्या गुन्ह्यांचीच आहे. पोलिस दप्तरी नोंदवण्यात आलेल्या गुन्ह्यांपैकी काही गुन्हे खून, बलात्कार, विनयभंग, अपहरण यासारखे गंभीर स्वरूपाचे देखील आहेत. गेल्या काही वर्षात बाल गुन्हेगारीचे प्रमाण खूप वाढले आहे. आजकालची मुले गुन्हेगार बनत आहेत ही अत्यंत धोक्याची व खेदाची बाब आहे. झोपडपट्टीत राहणारे अल्प उत्पन्न गटातील मुले गुन्हेगारीकडे लवकर ओढले जातात असे म्हंटले जाते. त्यांचे आई वडील मोल मजुरीसाठी घराबाहेर राहतात त्यामुळे ते मुलांना योग्य संस्कार देऊ शकत नाहीत परिणामी ही मुले गुन्हेगारीकडे वळतात असा तर्क काढला जातो. पण अहिल्यानगर मधील या व आधीच्या घटनेने हा तर्क चुकीचा ठरवला आहे. वर उल्लेख केलेल्या सर्व घटनेतील मुलांचे पालक उच्चशिक्षित असून हे मुले त्या त्या शहरातील प्रतिष्ठित शाळेतील विद्यार्थी आहेत. याचाच अर्थ सुशिक्षित पालकांचे मुलेही आता गुन्हेगारीकडे वळू लागले आहेत. भारतासारख्या देशात वाढती बाल गुन्हेगारी ही मोठी समस्या बनली आहे.

आजकालच्या मुलांमध्ये भाई, दादा, डॉन बनण्याची मोठी क्रेझ आहे. त्यामुळे ते गुन्हेगारीकडे वळत आहेत. अल्पवयीन मुलांच्या टोळ्या, गँग वाढत आहेत. पालकांचे लक्ष नसल्याने चोऱ्या, मारामारी, खून यासारख्या गुन्ह्यात अल्पवयीन मुले अडकत आहेत. या मुलांना वेळीच सल्ला किंवा मार्गदर्शन मिळत नाही ही वस्तुस्थिती आहे. देशातील बाल गुन्हेगारी वाढत आहे ही धोक्याची घंटा आहे. ती कमी करण्यासाठी मुलांना संस्कारक्षम वयात पालक, शिक्षक, समाज यांच्याकडून योग्य संस्कार व मार्गदर्शन मिळणे गरजेचे आहे. लहान वयात मुले काय करतात, त्यांच्या आवडीनिवडी काय आहेत याचाही विचार आई वडीलांनी करायला हवा. अभ्यासाकडे मुले दुर्लक्ष का करतात याचाही विचार पालक आणि शिक्षकांनी करायला हवा. शिक्षणाऐवजी मुले गुन्हेगारीकडे वळत आहे ही चिंतनीय बाब आहे याला जितकी सामाजिक परिस्थिती जबाबदार आहे तितकीच कौटुंबिक परिस्थिती देखील जबाबदार आहे. आपल्या देशात जोवर एकत्र कुटुंब पद्धती होती तोवर बाल गुन्हेगारीचे प्रमाण नगण्य होते पण एकत्र कुटुंब पद्धतीचा रहास झाला आणि बाल गुन्हेगारी फोफावत गेली असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. मुलांना चांगले शिक्षण देण्यासाठी पालक वाट्टेल ते करतात. त्यांना मोठ मोठ्या इंटरनॅशनल स्कूलमध्ये लाखो रुपये डोनेशन देऊन दाखल करतात. त्यांना हव्या त्या सर्व वस्तू पुरवतात पण मुलांसोबत वेळ घालवण्यास पालकांना फुरसत नसते. त्रिकोणी, चौकोनी कुटुंब पद्धतीत आजी आजोबा ही संकल्पना केंव्हाच मागे पडली आहे. आई वडील दोघेही नोकरीस असेल तर मुले दिवसभर घरी एकटीच असतात अशावेळी टीव्ही आणि मोबाईल हेच त्यांचे साथीदार असतात. मग दिवसभर टीव्ही वरील क्राईम मालिका पाहणे आणि मोबाईलवर हिंसक गेम खेळणे हाच त्यांचा उद्योग. दिवसभर क्राईम मालिका पाहून आणि मोबाईलवर हिंसक गेम खेळून मुलांच्या मनातही हिंसक विचार येतात. त्यातूनच मग अशा घटना घडतात. त्यामुळेच आज मूल्यशिक्षणाची मोठी गरज निर्माण झाली आहे. आज मुलांना जितकी शिक्षणाची गरज आहे तितकीच मूल्यशिक्षणाचीही आहे. परीक्षेत मिळणाऱ्या गुणांच्या आकडेवारीत मूल्यशिक्षण हरवत चालले आहे. मुलांवर संस्कार करण्यात पालक, शिक्षक आणि समाज कमी पडत आहे. मुलांवर संस्कार होण्यासाठी मूल्यशिक्षणाला पर्याय नाही. मूल्यशिक्षण काळाची गरज बनली आहे.

- श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

थोडक्यात

दोन दुचाकींची समोरासमोर जोरदार धडक... 3 ठार, १ गंभीर...

अक्षराज : प्रतिनिधी

दि.२९, अंबाजोगाई : अंबाजोगाई तालुक्यातील बरदापूर-हातोला रस्त्यावर लिमगाव पाटीजवळ शनिवारी (दि.२८) सायंकाळी दोन दुचाकींची समोरासमोर झालेल्या अपघातात तिघांचा मृत्यू झाला, तर एक जण गंभीर जखमी झाला.

या अपघातात अभय सतीश चव्हाण (वय २५, रा. हातोला) याचा जागीच मृत्यू झाला. त्याच्यासोबत असलेला ऋषिकेश अशोक चव्हाण (वय १८, रा. हातोला) गंभीर जखमी असून त्याच्यावर स्वाराती रुग्णालयात उपचार सुरू आहेत. दुसऱ्या दुचाकीवरील फारूख रहिमखाँ पठाण व नासीर खाजामियाँ शेख (दोघेही रा. पानगाव) हे गंभीर जखमी झाले होते. त्यांना लातूरला नेत असताना वाटेतच मृत्यू झाला.

त्याचवर रविवारी दुपारी १२ वाजता मुस्लिम समशान भूमीत अंत्यविधी करण्यात आले. एकाच गावातील दोन तरुणाचा या अपघातात मृत्यू झाल्यामुळे गावावर शोककळा पसरसरी होती.

न्यू इंग्लिश स्कूल पिलाणी विद्यालयात विद्यार्थ्यांना छत्री वाटप कार्यक्रम संपन्न

अक्षराज : बाळू धायगुडे

दि.२८, सातारा : श्री सम र्थ एज्युकेशन सोसायटी सोनवडी गजवडी संचलित न्यू इंग्लिश स्कूल पिलाणी विद्यालयात शिक्षक पालक सहविचार सभेचं आयोजन करण्यात आले होते. चालू शैक्षणिक वर्षातील शालेय नियोजन शालेय स्तरावर शासन आदेशानुसार विविध कमिट्या स्थापन करणे पट संख्या वाढी बाबत व शालेय स्तरावर येणाऱ्या अडीअडचणी बाबत तसेच विद्यार्थी व पालक यांच्या समस्या बाबत शाळेचे मुख्याध्यापक खराते सर यांनी सहविचार सभेचे आयोजन केले होते.

या सहविचार सभेचे औचित्य साधुन महाराष्ट्र राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचे समर्थक अँन्ड विक्रम पवार (पापा) यांच्या मार्फत व ग्रामपंचायत सदस्या शुभांगी साळुंखे यांच्या सहकार्याने मिळालेल्या छत्र्या चे वाटप त्यांच्या हस्ते व स्वप्नाली साळुंखे (पाटील) यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना करण्यात आले सहविचार सभा असल्याने पालक बहुसंख्येने उपस्थित होते. त्याचप्रमाणे संस्थेचे संचालक दिलीप साळुंखे (बापू) शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी ग्रामस्थ पालक बहुसंख्येने उपस्थित होते.

गहाळ झालेल्या मोबाईल वाहतूक पोलिसांनी केली परत

अक्षराज : विश्वनाथ शेनोय

दि.२९, कल्याण (ठाणे) : कल्याण वाहतूक शाखाचें हद्द पत्री पूल या ठिकाणी कल्याण वाहतूक शाखेचे अंमलदार पोलीस हवालदार पंढरीनाथ माली व ट्राफिक वार्डन राम चंद्र उज्जैनकर आपलं कर्तव्य बजावत असताना त्यांना त्या ठिकाणी रस्त्यावर सॅमसंग कंपनीचा मोबाईल मूळ किंमत २५०००/- असे असून ते त्यांना मिळाले. दुपारच्या वेळेस पत्री पुलावरील चौकी जेवण करत असताना त्या सॅमसंग मोबाईलवर फोन आला इसम नाव ; आलेन ओसावला (बोहरी) यांनी त्या अंमलदाराची गहाळ झालेल्या मोबाईल सविस्तर माहिती दिली. त्यानंतर त्यांनी त्यांना बोलवून शहा निशा केल्यानंतर ते मोबाईल त्यांना परत करण्यात आली. गहाळ झालेला मोबाईल मिळाल्यानंतर ओसावाला यांनी पोलीस प्रशासन व वाहतूक विभागाची कौतुक केले.

'वारी समाज परिवर्तनाची' 'ज्ञानेश्वरी तपोवन' उपक्रमाची कोपर्डे गावातून ऐतिहासिक सुरुवात

अक्षराज : बाळू धायगुडे

दि.२९, खंडाळा (सातारा) : वारी म्हणजे केवळ श्रद्धेचा प्रवास नव्हे, तर ती समाजपरिवर्तनाचीही चळवळ आहे, हे आज पुन्हा एकदा सिध्द झाले. कोपर्डे गावामध्ये 'वारी समाज परिवर्तनाची' या संकल्पनेतून एक ऐतिहासिक, पर्यावरणपूरक आणि आध्यात्मिक संकल्प शनिवार दि.२८ जून रोजी कोपर्डे ता. खंडाळा येथे साकार करण्यात आला.

महाराष्ट्र राज्य व्यसनमुक्ती महासंघाचे अध्यक्ष ह.भ.प. बंडातात्या कराडकर यांच्या प्रेरणेतून, हिरवे बाजारचे आदर्श सरपंच व भारत सरकारचे पद्मश्री पुरस्कार विजेते पद्मश्री पोपटराव पवार, श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीचे विश्वस्त शिवाजी महाराज मोरे तसेच गावचे सरपंच दिपक शिंदे व ग्रामस्थ कोपर्डे यांच्या संयुक्त संकल्पनेतून 'ज्ञानेश्वरी तपोवन' या नावाने एका अद्वितीय उपक्रमाचा शुभारंभ झाला.

या उपक्रमांतर्गत श्री संत ज्ञानेश्वर महाराजांच्या ज्ञानेश्वरी मध्ये ९०३० ओव्या आहेत तेवढ्याच संख्येची देशी वृक्षांची लागवड केली जाणार आहे. ही संख्या संत ज्ञानेश्वर माउलींच्या अमृतमय 'ज्ञानेश्वरी'तील ९०३० ओव्यांना समर्पित आहे. त्यामुळे हा उपक्रम केवळ पर्यावरणपूरक न राहता, तो आध्यात्मिक अधिष्ठान लाभलेला एक सांस्कृतिक प्रकल्प ठरत आहे. ग्रामस्थांनी व गावकऱ्यांनी या उपक्रमाला मनःपूर्वक पाठिंबा दिला असून, कोपर्डे हे गाव आता समाज परिवर्तन व पर्यावरण संवर्धनाच्या दिशेने एक नवा आदर्श निर्माण करत आहे.

हा उपक्रम केवळ कोपर्डेसाठी नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्रासाठी आणि वारकरी संप्रदायासाठी प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. या कार्यक्रमासाठी अनिल वाघमारे गट विकास अधिकारी खंडाळा, इंदूमती पडळकर (धायगुडे) ग्रामविकास अधिकारी, कृषी अधिकारी खंडाळा, जलमित्र दिपक शिंदे सालपे तसेच कोपर्डे येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दीपस्तंभ प्रतिष्ठानच्या वतीने प्रज्ञावंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा संपन्न

अक्षराज : गणेश गायकर

दि.२९, शहापूर (ठाणे) : अतिशय खडतर प्रवास असलेल्या नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत उत्तुंग यश संपादन करत ठाणे आणि पालघर या दोन्ही जिल्ह्यांसाठी एकत्रित असलेल्या नवोदय विद्यालयाम ध्ये ठाणे जिल्ह्यासाठी असलेल्या ४० विद्यार्थ्यांपैकी यावर्षी एकट्या शहापूर तालुक्यातील ३४ विद्यार्थी प्रवेशपात्र ठरले आहेत.या यशाचे कौतुक करण्यासाठी शनिवार दिनांक २८ जून २०२५ रोजी दीपस्तंभ प्रतिष्ठान शहापूर आयोजित नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा २०२५ मधील पात्र विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा आगरी सम ाज हॉल शहापूर येथे संपन्न झाला.

कार्यक्रमाप्रसंगी पंचायत समिती शहापूरचे माजी गटशिक्षणाधिकारी हराजी वेखंडे, शिवानी पवार, शिक्षणविस्ताराधिकारी चिंतामण वेखंडे, शिक्षणविस्ताराधिकारी पांडुरंग महाळुंगे, केंद्रप्रमुख विलास वेखंडे, पेन्शन एसोसिएशन शहापूरचे अध्यक्ष बाळासाहेब खारीक, धडाडीचे पत्रकार वसंत पानसरे या मान्यवरांच्या शुभहस्ते ३४ प्रज्ञावंत विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, भेटवस्तू आणि २०० रुपये रोख रक्कम प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

चिंतामण वेखंडे यांनी दीपस्तंभ प्रतिष्ठानच्या कार्याचा गौरव करताना कोरोना काळात प्रचंड मेहनत घेऊन शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन करणाऱ्या विद्यार्थी तसेच शाळांचा प्रतिष्ठानने प्रत्यक्ष शाळेत जाऊन गौरव केला आहे याची आठवण करून देत आजचा हा सन्मान सोहळा ही जणू त्याचीच फलश्रुती असल्याचे आवर्जून नमूद केले.

त्यानंतर सुधाकर पाटील यांनी दीपस्तंभ प्रतिष्ठानच्या वतीने दरवर्षी आयोजित करण्यात येणाऱ्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती सराव परीक्षा तसेच नवोदय विद्यालय निवड सराव परीक्षेचा उल्लेख करत ह्या परीक्षा पूर्णतः अंतिम परीक्षेच्या धर्तीवर आधारित असल्याने या दोन्हीही परीक्षांच्या निकालात जवळजवळ साम्य असल्याचे त्यांनी सांगत स्पर्धा परीक्षा आणि दीपस्तंभ यांचे नाते अगदी घट्ट असल्याचे नमूद केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून आपले मनोगत व्यक्त करताना पंचायत समिती शहापूरचे माजी गटशिक्षणाधिकारी हिराजी वेखंडे यांनी दीपस्तंभ प्रतिष्ठानचे कार्य निश्चितच सर्वांसाठी आदर्शवत असल्याचे सांगत दीपस्तंभ प्रतिष्ठान हे नावाप्रमाणे सर्वांसाठी दीपस्तंभ ठरत आहे. अशा शब्दांत प्रतिष्ठानच्या कार्याचे कौतुक केले. त्याचबरोबर विद्यार्थ्यांचे कौतुक करताना हे यश शहापूरसाठी भूषणावह असल्याचे आवर्जून सांगितले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रतिष्ठानचे कोषाध्यक्ष सुधीर पाटोळे, आभारप्रदर्शन अरुण कराळे यांनी केले. तर संपूर्ण कार्यक्रमाचे निवेदन प्रतिष्ठानचे सचिव योगेश ठाकरे यांनी केले.

तसेच हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रतिष्ठानचे शिलेदार योगेश रोठे, नारायण मोहपे, राजकुमार शेलवले, प्रविण वेखंडे, किशोर शेलवले, पि.डि.जाधव, तुषार सापळे, सुहास दिनकर या सर्व शिलेदारांनी खूप मेहनत घेतल्याचे प्रतिष्ठानचे विद्यमान अध्यक्ष महेश धिर्डे यांनी सांगितले.

हिंदी सक्तीविरोधात 'शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे' पक्षाचा तीव्र निषेध

अक्षराज : विनोद वास्कर

दि.२९, दिवा (ठाणे) : दिवा शहरातील प्रभाग क्रमांक २८ मध्ये आज शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने राज्य सरकारने लादलेल्या हिंदी सक्तीविरोधात तीव्र निषेध नोंदवत सरकारच्या हिंदी सक्तीच्या जीआरची होळी करण्यात आली.

या आंदोलनाद्वारे केंद्र सरकारचा विरोध करताना मराठी भाषेवरील अन्यायाविरोधात संतप्त प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आल्या.

दिवा शहरात 'जीआर'ची होळी...

मराठी माणसाचा, मराठी भाषेचा अपमान सहन केला जाणार नाही, अशा निर्धारपूर्ण घोषणा देत स्थानिक कार्यकर्त्यांनी सरकारच्या निर्णयाचा निषेध केला. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने वारंवार सांगितले आहे की, महाराष्ट्राच्या म ातृभाषेवर कुठलीही सक्ती, भले ती भाषेच्या नावाखाली का असेना, सहन केली जाणार नाही. दिवा शहरातील कार्यकर्त्यांनीही आजचा आंदोलनाद्वारे हाच संदेश पुन्हा राज्य सरकारपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला. या आंदोलनात शिवसेनेचे कल्याण ग्रामीण विधानसभा प्रमुख रोहिदास मुंडे, विधानसभा संघटिका योगिता नाईक, महिला संघटिका ज्योती पाटील, उपशहर प्रमुख मारुती पडलकर, उप शहर संघटक शनिदास पाटील, विभाग प्रमुख संजय जाधव, योगेश निकम, हेमंत नाईक, रवी रसाळ, नागेश पवार, उपविभाग प्रमुख संजय अर्धालकर, संजय निकम, संदीप राऊत, शाखाप्रमुख शैलेश कदम, दीपक उतेकर, मूर्ती मुंडे, दत्ता भोसले, उपशाखाप्रमुख राजेंद्र शिरसेकर, महेश मुलम, ज्ञानेश्वर कदम, शंकर राणे, आकाश विचारे, संजय राहंडाले, विलास मुलम, अमित कुर्ताळकर स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक म ोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

पनवेल मनपा चा हरित उपक्रम ; वृक्षारोपणासाठी नागरिकांना मोफत रोपे

अक्षराज : जे. के. पोळ

दि.२९, पनवेल : स्वच्छ पनवेल, सुंदर पनवेल, हरित पनवेल या संकल्पनेखाली पनवेल म हानगरपालिकेच्या उद्यान विभागामार्फत मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण मोहीम राबवण्यात येत आहे.

या उपक्रमांतर्गत महानगरपालिकेच्या विविध उद्यान केंद्रांवरून नागरिकांना मोफत देशी वृक्षांचे रोपे उपलब्ध करून दिली जात आहेत. या सुविधेचा नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी केली आहे. बदलत्या हवामानाचा परिणाम कमी करण्यासाठी आणि पर्यावरण संतुलन राखण्यासाठी आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनूसार पनवेल म हानगरपालिकेने व्यापक वृक्षारोपण मोहिम हाती घेतली आहे. या मोहिमेंतर्गत शहरातील विविध ठिकाणी एक लाखाहून अधिक झाडे लावण्याचा निर्धार केला आहे. याची सुरूवात पर्यावरण दिनानिमित्ताने महापालिकेच्या चारही प्रभागात ११०० झाडांचे रोपण करून करण्यात आली आहे.

तसेच मागील महिन्यात अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकित वृक्ष लागवड समिती स्थापन करण्यात आली आहे. याबरोबरच महापालिकेच्या या व्यापक वृक्षारोपण मोहिमेत पनवेलकरांनी सहभागी व्हावे याकरिता महापालिका कार्यक्षेत्रातील विविध शाळा, महाविद्यालये, एनएसएस विभाग शिक्षक, पर्यावरण क्षेत्रात काम करणाऱ्या विविध सामाजिक संस्था व स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनीधींची नियोजन बैठक अतिरीक्त आयुक्त गणेश शेटे यांच्या अध्यक्षतेखाली मुख्यालयात आयोजित करण्यात आली होती.

त्यानूसार विविध शाळा, महाविद्यालये, एनएसएस विभाग, पर्यावरण क्षेत्रात काम करणाऱ्या विविध सामाजिक संस्था व स्वयंसेवी संस्थांनी, नागरिकांनी महापालिका क्षेत्रात विविध ठिकाणी वृक्षारोपण करण्यासाठी महापालिकेच्या विविध प्रभागातील उद्यान पर्यवेक्षकांशी संपर्क साधून रोपे घेण्याचे आवाहन उपायुक्त डॉ.वैभव विधाते यांनी महापालिकेच्या वतीने केले आहे.

पनवेल महानगरपालिका– स्वच्छतेशी कटिबद्धता राखत हरित उपक्रमांद्वारे पर्यावरण संवर्धनासाठी पुढे सरसावली आहे. चला पनवेल हरित करूया, निसर्गाला वाचवूया असे आवाहन महानगरपालिका प्रशासनाने केले आहे. नागरिकांनी महापालिकेच्या विविध प्रभागातील उद्यान पर्यवेक्षकांशी संपर्क साधावा.

१. खारघर : आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके उद्यान, सेक्टर १२, प्लॉट क्र. ०१, खारघर नितीन राठोड – मो.नं. ९३७३८१३४६७ /८९९९६११९४४

२. तळोजा : सेक्टर १४, प्लॉट क्र.१९, तळोजा नितीन राठोड – मो.नं.९३७३८१३४६७ /८९९९६११९४४

३. कळंबोली : सेक्टर २०, प्लॉट क्र.२६, रोडपाली पोलीस मुख्यालय समोर, कळंबोली. विशाल हुडेकर –म ो.नं ९४०४४३९३४५

३. कामोठे : सेक्टर २०, प्लॉट क्र.२८ + ३५-३६, स्मशानभूमीसमोर, कामोठे, मांगीलाल जाधव– मो.नं.७७७००३०५८२

४. पनवेल : सेक्टर १६, प्लॉट क्र.३, पिल्लई कॉलेजच्या मागील बाजूस, नवीन पनवेल सिध्दार्थ कांबळे– मो.नं. ९६५०७२०९३३

वृक्षारोपण मोहिमेत वितरीत करण्यात येत असलेल्या वृक्षांची नावे :

बहावा, ताम्हण, कांचन (गुलाबी), कांचन (सफेद), समुद्रफळ, फणस, रबर, सोनचाफा, पारिजातक, बकुळ, तुती, कदंब, करंज,अर्जुन, शमी, काजु, सीता अशोक, जांभूळ, बेल, चाफा (लाल), शार्दूल, कोनोकारपस. पनवेल महानगरपालिकेच्या 'पनवेल कनेक्ट' ॲपवर देखील नागरिकांना वृक्षारोपण करण्यासाठी विशेष टॅबची सोय करण्यात आली आहे. नागरिकांना या ॲपच्या माध्यमातून वृक्षारोपण करण्यासाठी झाडांची मागणी करता येणार आहे. या ॲपवर मागणी आल्यास पालिका नागरिकांना घरपोच झाडे देणार आहे.

पारसिक हिल, बेलापूर येथील धोकादायक इमारत निष्कासनाची कारवाई

अक्षराज : जे. के. पोळ

दि.२९, नवी मुंबई : भूखंड क्र.५९, सेक्टर-२६, पारसिक हिल, सीबीडी बेलापूर येथील इमारतीचा काही भाग दि.२७ जून २०२५ रोजी कोसळल्याची माहिती मि ळाल्यानुसार बेलापूर विभाग कार्यालयाचे अधिकारी, कर्मचारी यांनी त्या ठिकाणी पाहणी केली असता इमारतीचा काही भाग कोसळल्याचे निर्दशनास आले. त्यानुसार दि.२८ जून २०२५ रोजी सदर भूखंडावरील धोकादायक स्थितीत असलेली इमारत ए विभाग कार्यालय बेलापूर, यांचेमार्फत पूर्णत: निष्कासित करण्याची कारवाई करण्यात आली आहे. महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांचे आदेशानुसार, अतिक्रमण विभागाचे उपआयुक्त डॉ.कैलास गायकवाड यांच्या नियंत्रणाखाली, बेलापूर विभागाचे सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी डॉ. अमोल

पालवे तसेच उपअभियंता पंढरीनाथ चौडे, कनिष्ठ अभियंता अभय गावीत व धिरेन भोईर, नयन भोईर यांचे उपस्थितीत ही धोकादायक इमारत निष्कासनाची कारवाई करण्यात आली. या धडक मोहिमेसाठी बेलापूर विभाग कार्यालय येथील अधिकारी– कर्मचारी तसेच अतिक्रमण विभागाकडील सुरक्षारक्षक कार्यरत होते. जेसीबींसह, फोकलँड ही यंत्रसामुग्री आणि मजूर यांच्या सहकार्याने ही कारवाई करण्यात आली.

हवामानावर आणि निसर्गावर आधारित शेती करा – पंजाबराव डख

अक्षराज : वसंत रांधवण

दि.२८, पारनेर (अहिल्यानगर) : मोठ्या प्रमाणात वृक्ष तोड झाल्याने १९९५ पासून महाराष्ट्रातील पाऊस गुजरातकडे पडतो, इथून पुढे निसर्ग बदलल्याने वातावरणात बदल होऊन कमी अधिक प्रमाणात पडणार्या पावसामुळे शेतीचे नियोजन करणे गरजेचे आहे. त्यामुळे मी शेतकर्यांसाठी महाराष्ट्रभर फिरत शेतकर्यांना शेतीच्या नुकसानीपासून वाचवण्यासाठी या अभ्यासाचा उपयोग करतो. भविष्यात देखील शेतकर्यांसाठी हवामान अंदाज खूप महत्वपूर्ण आहे. शेतकरी पिक लावणी पासून कापणी पर्यंत राबतो आणि पिक काढणीच्या दिवशी गारपीट, वादळी पावसाने तोंडी आलेला घास निसटून जातो. यासाठी हवामानाचा अंदाज घेवून निसर्गावर आधारित शेती व यापुढे निसर्गाच्या विरुद्ध शेती करू नका, असा सल्ला हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांनी केले आहे.

पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथे आदर्श शिक्षक, भूजल अभ्यासक स्वर्गीय सुखदेव साळवे यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त आज (दि.२९) आयोजित

शेतकरी मेळाव्यात मार्गदर्शन करताना ते बोलत होते. जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील, अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे विश्वस्त सिताराम खिलारी, निलेश लंके प्रतिष्ठानचे पारनेर तालुका अध्यक्ष बाळासाहेब खिलारी, माजी सभापती अरुण ठाणगे, देवकृपा फाउंडेशनचे सदस्य युवा नेते अमोल साळवे, निजाम पटेल यांचेसह टाकळी ढोकेश्वर परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्री. डख म्हणाले, हवेचा दाब निर्माण होऊन तापमान वाढल्याने अवकाळी पाऊस पडतो. त्यासाठी तापमान नियंत्रण करण्यासाठी निसर्गाचा समतोल साधण्याचा विचार झाला पाहिजे. यासोबत पाऊस येईल याबाबत निसर्ग व पक्षी काही सुतोवाच देतात, ते ओळखता आले पाहिजे यावर देखील त्यांनी मार्गदर्शन केले. वीज कडाडत असताना झाडाखाली किंवा मोकळ्या जागेत उभे राहू नये, वेळ आलीच तर पायाखाली लाकूड ठेवून उभे रहावे. १६ टक्के वीज ही झाडांवर पडते तर २८ टक्के प्रमाण उघड्या मैदानावर पडते. आता पाऊस अधिक पडत असल्याने, पिकांवर सीएमव्ही आणि करपा येत आहे. ४ महिने आधी वातावरणाचा अंदाज घेवून शेतकऱ्यांना माहिती देतो. लाखो लोकांना नुकसान टाळता येते. प्रत्येक जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा ग्रुप तयार करून त्यांना वेळोवेळी हवामानाची माहिती देतो. मी सोशल मीडिच्या माध्यमातून हवामान अंदाज सांगत असतो, ३ मिनीटांत पाच लाख लोकांना मेसेज गेल्याने शेतकर्यांचे होणारे नुकसान टळते. नगर जिल्ह्यात पूर्वे कडून पाऊस आला तर खुप पाऊस पडतो. पश्चिमेकडून पाऊस आलातर कमी पाऊस पडतो. २०२४ साली खुप पाऊस पडणार असल्याचे डख यांनी सांगितले असून मान्सून २ जुलैला पुन्हा सक्रिय होईल, असेही ते म्हणाले. प्रसाद झावरे यांनी आभार मानले.

लोणावळा

निसर्गाने मुक्तकंठाणे उधळण केलेला पृथ्वीवरील स्वर्ग...

✍शब्दांकन : संजय पंडित

लोणावळा.... मुंबई जवळील पुणे जिल्ह्यातील सुंदर आणि प्रसिद्ध थंड हवेचे ठिकाण. लोणावळ्यात तशी बाराही महिने पर्यटकांची रहदारी पाहाव्यास मिळते, याचे कारण म्हणजे इथले नैसर्गिक सौन्दर्य. निसर्गाने देखील येथील डोंगर दऱ्या खोऱ्यात आणि वनराईत उदार होऊन अगदी मुक्तकंठाणे केलेली पहावयास मिळते. म्हणून तर लोणावळ्याला पृथ्वी वरील स्वर्गाची उपमा दिली आहे.

लोणावळ्यातील डोंगर, दऱ्या, धबधबे आणि हिरवीगार झाडी आहेत.तसेच इथे लोहगड, विसापूर आणि तुंगी सारखे ऐतिहासिक किल्ले आहेत. पावसाळ्यात येथे अनेक धबधबे (उदा. भुशी धरण) तयार होतात, जे पर्यटकांना खूप आवडतात.

येथील भाजे आणि कार्ला गुंफांनाही पर्यटक आवर्जून भेट देतात. याच दरम्यान लोणावळ्यात अपल्याला स्थानिक वस्तू तथा मागनलाल आणि इतर ब्रँडच्या वेगवेगळ्या चिक्की खरेदी करता येतात.

पावसाळ्यात लोणावळा अधिक सुंदर दिसतो, पण मुसळधार पावसामुळे रस्ते आणि वाहतूक थोडीशी त्रासदायक असू शकते. उन्हाळ्यात मात्र हवामान थोडे उष्ण असले तरी, पर्यटनासाठीखुप चांगले असते.

हिवाळ्यात हवामान खूप आल्हाददायक असते,पण पावसाळ्यात लोणावळ्याला भेट देणे खूपच छान आणि आनंददायी असते, कारण या काळात निसर्गाची हिरवळ आणि धबधबे खूप सुंदर दिसतात. पावसाळ्यात लोणावळ्यातले वातावरण खूप आल्हाददायक आणि शांत असते. पावसाळ्यात लोणावळ्यातील डोंगर आणि दऱ्या हिरव्यागार होऊन पर्यटकांना आकर्षित करतात.येथील धबधबे (उदा. भुशी धबधबा, कुणे धबधबा) पूर्ण क्षमतेने ओसंडून वाहत असल्याने त्यांचे सौंदर्य पाहण्यासारखे असते. पावसाळ्यातील थंड हवा आणि वातावरण पर्यटनासाठी खूपच आनंददायी असते. पावसामुळे पर्यटकांची गर्दी कमी असल्याने इथे आगळी वेगळी शांतताही अनुभवायला मिळते. याच दरम्यान ट्रेकिंग आणि इतर ॲडव्हेंचर ॲक्टिव्हिटीज करणे देखील खूप मजेदार असते. येथील धबधब्याखाली भिजणे देखील हा एक खास अनुभव असतो. येथील हिरव्यागार डोंगर आणि दऱ्यांमध्ये फिरून निसर्गाचा मनसोक्त आनंद घेताना अनेक ट्रेकिंगसाठी सुंदर ठिकाण देखील पाहता येतात. लोणावळ्यातील वर्षा विहाराचा मनसोक्त आनंद लुटत असताना तुमच्या मनाला आल्हाददायक सुखद गारवा देणाऱ्या धुक्याच्या आनंदा सोबतच गरमागरम चहा, कांदा भजी,मक्याचे कणीस स्वीट कॉर्न,मोठ मोठे पेरू आणि इतर स्थानिक पदार्थांची चव घेणे म्हणजे एक वेगळाच अनुभव असतो.

म्हणूनच जर अशा प्रकारे निसर्गाने उधळण केलेल्या विविध नैसर्गिक सुखांचा अनुभव घ्यायचा असेल तर पृथ्वी वरील या स्वर्गास एकदा तरी भेट द्यायलाच हवी. दरम्यान लोणावळ्याला जाण्याठी मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग मुंबई आणि पुणे येथून लोणावळ्याला जाण्यासाठी हा एक चांगला मार्ग आहे. मुंबई आणि पुणे येथून लोणावळ्यासाठी नियमित रेल्वे गाड्या आहेत. तसेच मुंबई आणि पुणे येथून लोणावळ्यासाठी बस सेवा उपलब्ध देखील आहे.

टीप : पावसाळ्यात लोणावळ्यात जाताना, तुमच्यासोबत रेनकोट आणि छत्री घेऊन मात्र अवश्य घेऊन जा.

थोडक्यात

भावानेच भावाचा गळा दाबून केली हत्या

हरदोना (बु.) येथील हत्याप्रकरणी दोघांना अटक

अक्षराज : वसंत वडस्कर

दि.२९, राजुरा (चंद्रपूर) : राजुरा तालुक्यातील हरदोना (बु.) गावात भावाने भावाचा गळा दाबून हत्या केल्याची घटना दि. २८ जून रोजी रात्री नऊ वाजता घडली. प्रदीप मनोहर चीलमुले (२४) राहणार हरदोना (बु.) असे मृतकाचे नाव आहे. याप्रकरणी राजुरा पोलिसांनी वडील मनोहर चिलमुले (५०) व भाऊ प्रफुल मनोहर चिलमुले (३०) यांना अटक केले आहे.

प्राप्त माहितीनुसार हरदोना (बु.) येथे राहणारे मनोहर चीलमुले यांना तीन मुले आहेत . २८ जून रोजी रात्री नऊ वाजता च्या दरम्यान मृतक प्रदीप हा आपल्या पत्नीसोबत भांडण करून तिला मारहाण करीत होता. त्याचा मोठा भाऊ प्रफुल चिलमुले हा त्याचे भांडण सोडविण्यासाठी मध्यस्थी करायला गेला असता प्रदीप चीलमुले यांनी त्याला काठीने हातावर मारले. त्यामुळे त्याचे वडील मनोहर चिलमुले हे मध्यस्थी करिता गेले. प्रदीप चिलमुले हा त्या दोघांनाही ऐकत नसल्याने प्रफुल चिलमुले यांनी त्याला खाली पाडून हाताने गळा दाबून ठेवला व त्याचे वडील मनोहर चिलमुले हे घरातील दोरी आणून त्याचे हात बांधत असताना प्रफुल चीलमुले यांनी प्रदीपचा गळा दाबून ठेवल्याने प्रदीप हा अचानक बेशुद्ध पडला. त्याला उपचाराकरिता ग्रामीण रुग्णालय गडचांदूर येथे नेले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. वडील आणि भावाने दोघांनीही संगनमत करून प्रदीप चीलमुले यांचा गळा दाबून खून केल्याने राजुरा पोलीस स्टेशन येथे अपराध क्रमांक ३०५/२०२५ कलम १०३(१),३(५) बीएनएस अंतर्गत गुन्हा नोंदविला असून दोघांना अटक केली आहे.

पुढील तपास राजुरा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सुमित परतेकी यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक लक्ष्मण लोकरे, पोलीस उपनिरीक्षक भीष्मराज सोरते, पांडुरंग हाके, पोलिस अमलदार किशोर तुमराम, शफीक शेख, महेश बोलगोडवार, शरद राठोड, आनंद मोरे, राजुरा पोलिस स्टेशनचे स्थानिक गुन्हे शोध पथक करीत आहे.

'अक्षर मानव'च्या बीड जिल्हा अध्यक्षपदी पद्मजा हंपे

अक्षराज : शिवाजी औसेकर

दि.२९, केज : माणूस, त्यांचा मेंदू, त्याचं घर आणि एकूण मानवी समाज शांत, आनंदी, सुखी जगला पाहिजे यासाठी काम करणाऱ्या अक्षर मानव संघटनेच्या बीड जिल्हा अध्यक्षपदी पद्मजा हंपे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे.

अक्षर मानवाचे महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष प्रा.प्रवीण जावळे, उपाध्यक्ष दीपेश मोहिते, सचिव अरुण मापारी, संघटक प्रा.सुजित चव्हाण यांनी पद्मजा हंपे यांची बीड जिल्हाध्यक्षपदी निवड केली आहे. कोणीही आपल्या गाव, तालुका, जिल्हा, राज्य, देश, जग या कोणत्याही पातळीवर संघटनेसोबत आपल्या आवडीच्या क्षेत्रात काम करू शकतात. ज्यांना अक्षर मानव सोबत जोडून घ्यायचं आहे, त्यांनी ९५२७२१२२३३ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क करावा असे आवाहन असे अक्षर मानवकडून करण्यात आले आहे. अक्षर मानव ही सामाजिक संघटना शिक्षण, कला, आरोग्य, पर्यावरण, उद्योग, श्रम,विज्ञान, शेती, साहित्य यासह ७० क्षेत्रात कार्यरत असून त्यासंबंधी विषयाचे संमेलने, शिबिर, कार्यशाळा गप्पा, संवाद, सहवास अशा प्रकारचे उपक्रम महाराष्ट्रभर विविध भागात राबवते.

मुक्रमाबाद येथील तरुण शेतकऱ्याचा 'स्टार चॅनल अवार्ड २०२४' ने सन्मान

अक्षराज : अशोक लोणीकर

दि.२८, मुखेड (नांदेड) : मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद येथील तरुण शेतकरी असलेले धनराज गंदीगुडे यांनी अत्यंत अल्प कालावधीमध्ये खूप चांगल्या पद्धतीने शेती करून स्वतःसह इतर शेतकऱ्यांनाही सहकार्य करत शेती क्षेत्रामध्ये नाविन्यपूर्ण व उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल राजलक्ष्मी हायटेक नर्सरी चे मालक धनराज महादेवआप्पा गंदीगुडे यांना नामांकित सिजेंटा कंपनीच्या वतीने 'स्टार चॅनल अवार्ड २०२४' ने सन्मानित करण्यात आले. यावेळी

सिजेंटा कंपनीचे नांदेड जिल्हा प्रमुख हर्षल पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. धनराज गंदीगुडे या तरुण शेतकऱ्याचा सत्कार व सन्मान करण्यात आल्याने त्यांचे कौतुक केले आहे.

सोबलेवाडी-बुगेवाडी येथे विजेच्या ट्रान्सफॉर्मरचे लोकार्पण... विजेच्या प्रश्नावर सुजित झावरे पाटील यांचे निर्णायक कार्य

अक्षराज : वसंत रांधवण

दि.२९, पारनेर (अहिल्यानगर) : तालुक्यातील सोबलेवाडी-बुगेवाडी येथे बुधवारी ऐतिहासिक आणि शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा दिवस ठरला. जिल्हा परिषद माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांच्या विशेष प्रयत्नातून मंजूर करण्यात आलेल्या विजेच्या ट्रान्सफॉर्मरचा लोकार्पण कार्यक्रम सुजित झावरे पाटील यांच्या हस्ते करण्यात आला.

शेतीसाठी आवश्यक असलेली वीज ही ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसाठी अत्यावश्यक बाब आहे. गेल्या अनेक वर्षांपासून सोबलेवाडी, बुगेवाडी व परिसरातील शेतकऱ्यांना वारंवार वीजपुरवठ्याच्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. या अडचणींबाबत अनेक वेळा निवेदने, मागण्या, पाठपुरावा करण्यात आला होता. परंतु समाधानकारक तोडगा निघत नव्हता. यावेळी या परिसरातील विजेच्या समस्येची

गांभीर्याने दखल घेत सुजित झावरे पाटील यांनी सातत्याने पाठपुरावा करत अखेर ट्रान्सफॉर्मर मंजुरी आदेश मिळवले आणि ते आज कार्यान्वित करत शेतकऱ्यांच्या आनंदाला भरघोस उधाण आले.

या कार्यक्रमात बोलताना झावरे पाटील म्हणाले की, शेतकऱ्यांच्या प्रत्येक समस्येला मी माझी समस्या मानतो. विजेचा प्रश्न हा केवळ एक तांत्रिक मुद्दा नसून शेतकऱ्याच्या रोजीरोटीचा प्रश्न आहे. आज हे ट्रान्सफार्मर कार्यान्वित करून विजेचा प्रश्न सुटला असला तरी भविष्यातही शेती, पाणी, रस्ते, शिक्षण अशा सर्व क्षेत्रांत शेतकऱ्यांसाठी माझे काम अविरत सुरू राहील. हा लोकार्पण सोहळा केवळ ट्रान्सफॉर्मर कार्यान्वित करण्याचा नव्हता, तर तो शेतकऱ्यांच्या हक्कासाठी लढणाऱ्या एका संवेदनशील नेतृत्वाच्या कार्याचा होता. सुजित झावरे यांनी दाखवलेले काम हे इतरांसाठी प्रेरणादायी आहे.

स्वतः ट्रॅक्टर चालवत शेतकऱ्यांमध्ये दाखल...

विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे, पावसामुळे रस्ते खराब झालेले असून शेतांमध्ये चिखल साचलेला असतानाही झावरे पाटील यांनी कार्यक्रमस्थळी पोहोचण्यासाठी कोणतीही टाळाटाळ न करता स्वतः ट्रॅक्टरचे स्टेअरिंग हातात घेत गावात दाखल होणे, हे उपस्थित शेतकऱ्यांमध्ये कौतुकाचा विषय ठरला. सुजित झावरे पाटील यांची अशी शेतकऱ्यांशी नाळ जोडलेली पाहून हा खरा शेतकऱ्यांचा नेता आहे असे म्हणत उपस्थितांनी त्यांचे स्वागत करत अभिनंदन केले.

शेतकऱ्यांना विश्वासात घेऊनच शक्तीपीठ महामार्गाचा पुढील निर्णय ; मोजणीची प्रक्रिया तूर्तास स्थगित

अक्षराज : विकास वाघ

दि.२९, धाराशिव : राज्यातील महत्वाकांक्षी शक्तीपीठ महामार्ग प्रकल्पाच्या अंमलबजावणी करताना बाधित शेतकऱ्यांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य असणार आहे. त्या पार्श्वभूमीवर 'मित्र'चे उपाध्यक्ष तथा आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी धाराशिव जिल्ह्यातील १९ गावांतील शेतकऱ्यांसोबत सविस्तर संवाद साधला. सर्व शेतकरी बांधवांचे म्हणणे जाणून घेतले. शेतकऱ्यांनीही आपल्या समस्या, शंका व मागण्या मोकळेपणाने मांडल्या. आमदार पाटील यांनी त्या सर्व बाबींची गांभीर्याने दखल घेत,

सध्या सुरू असलेली जमिनीची मोजणी अतिरिक्त जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार तात्काळ थांबवण्यात आली आहे.शेतकऱ्यांना विश्वासात घेतल्याशिवाय महायुती शासन कोणताही पुढील निर्णय घेणार नाही, अशी स्पष्ट ग्वाही दिली.

जमिनीची नोंद व प्रत्यक्ष शेतीचा विरोधाभास...

अनेक शेतकऱ्यांनी यावेळी सांगितले की, त्यांच्या जमिनीची नोंद जिरायत म्हणून आहे. मात्र प्रत्यक्षात ती बागायती शेतीसाठी वापरली जात आहे. त्यामुळे मावेजा ठरवताना ही बाब लक्षात घेऊन जमिनीचे स्वरूप बागायती म्हणूनच स्वीकारले जावे. अशी मागणी यावेळी करण्यात आली. याबाबत योग्य ती पडताळणी करून असे क्षेत्र बागायतीच ग्राह्य धरण्याबाबत प्रशासनाची भूमिका राहील असे आमदार पाटील यांनी म्हटले.

तुळजापूर तालुक्यातील खुंटेवाडी गावातील सुमारे ८० टक्के शेतकरी प्रकल्पामुळे भूमिहीन होणार आहेत. जमिनी गेल्यावर आमचं भवितव्य काय ? असा प्रश्न या भागातील शेतकरी बांधवांनी उपस्थित केला. याबाबत पुढील आठवड्यात सर्व संबंधीत अधिकाऱ्यांची मुंबईत बैठक घेऊन योग्य पर्याय काढण्याचे आमदार पाटील यांनी आश्वस्त केले.बाधित शेतकऱ्यांना मावेजा देण्याबाबत देखील चर्चा झाली. त्यावर प्रचलित दराचा विचार करून शेतकऱ्यांना या विषयात न्याय देण्याबाबत शासनाचा सहानुभूतीचा दृष्टिकोन राहणार असल्याचे आमदार पाटील यांनी म्हटले आहे.

शासनाच्या विविध प्रस्तावित उपाययोजना...

महामार्गाच्या लाभक्षेत्रात शेतीस चालना देण्यासाठी प्रत्येक १०० किलोमीटर अंतरात १००० शेततळी निर्माण करण्याचा शासनाचा संकल्प आहे. यामुळे जलसंधारण व सिंचनाच्या दृष्टिकोनातून मोठा फायदा होणार आहे. महामार्गालगत असलेल्या सर्व ओढ्या-नाल्यांवर पूल-कम-बंधाऱ्यांची उभारणी करण्यात येणार असून,यामुळे पावसाळी पाणी व वाहतुकीचे अडथळे टळणार आहेत.